आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२७ जुलै २०२४ - शनिवार

विकसित भारत २०४७ हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं महत्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत नीती आयोगाच्या ९ व्या बैठकीत ते आज बोलत होते. या वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य ‘विकसित भारत २०४७’ असून त्याच्या ध्येय धोरणांच्या मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसेच सदस्य उपस्थित आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२४ च्या अर्थसंकल्पाची रूपरेषा नमो ॲपवर सामायिक केली आहे. या रुपरेषेत रोजगार निर्मिती आणि कौशल्या संबंधित विविध सरकारी घोषणा, योजना आणि नवीन उपक्रमांची सोप्या पद्धतीनं माहिती देण्यात आली आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११२वा, भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच newsonair.gov.in हे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲपवरून थेट प्रक्षेपित केला जाईल. आकाशवाणी, दूरदर्शन, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनल्सवरूनही कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण आपण ऐकू शकाल.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकासंदर्भात महाविकास आघाडीची चर्चा झाली असून संसदेच्या अधिवेशनानंतर जागावाटपासंबंधीची चर्चा पुढे जाईल, असं राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितलं आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांनी आज वार्ताहरांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीनंतर अजित पवार यांच्यासोबत गेलेले परभणीचे विधानपरिषदेचे आमदार बाबाजानी दुर्रानी यांनी आज शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. जे विचारानं आमच्यासमवेत आहे, त्यांना पक्षात परत घेण्यासंबंधी पक्षाचे नेते निर्णय घेतील, असं पवार म्हणाले.

**<><><><><>**

पश्चिम रेल्वेच्या बोईसर रेल्वे स्थानकाच्या यार्डमध्ये आज मालगाडीचे चार डबे रुळावरून खाली घसरले. यात कोणतीही हानी झाली नसून पश्चिम रेल्वेच्या वाहतुकीवर याचा परिणाम झाला नसल्याचं सांगण्यात आलं आहे.

**<><><><><>**

**राज्यात** नवी मुंबईच्या बेलापूरमधल्या सेक्टर १९ मधल्या शाहबाज गावातली एक तीन मजली इमारत आज पहाटे कोसळून यात तिघांचा मृत्यू झाला आहे. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या दोघांना अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढलं असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मदत आणि बचावकार्य सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या घटनेबद्दल नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलाश शिंदे यांच्याशी चर्चा केली आणि दुर्घटनाग्रस्त लोकांना तातडीनं आवश्यक मदत देण्याची सूचना केली. या घटनेतल्या दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश नवी मुंबई महापालिका आयुक्त आणि पोलिस आयुक्तांना देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

दरम्यान, **कोल्हापूरमध्ये** उद्भवलेल्या पूरसदृश परिस्थितीचाही आढावा शिंदे यांनी घेतला. मदत आणि बचाव कार्यासाठी एनडीआरएफ आणि एसडीआरएफची पथकं तैनात करावीत, गरज भासल्यास भारतीय लष्करालाही पाचारण करावं, असे निर्देश त्यांनी दिले.

हवामान विभागानं आज **मुंबईला** यलो अलर्ट, तर रा**यगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, चंद्रपूर आणि गोंदिया** या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेच्या  नेमबाजी १० मिटर मिश्र एअर रायफल प्रकारा साठीच्या  पदकांच्या शर्यतीतून भारतीय संघ बाहेर पडला आहे. आज झालेल्या पात्रता फेरीच्या स्पर्धेत भारताचे संदीप सिंग आणि एलविन वलारिवान पात्रता फेरीत १२ व्या स्थानावर  तर अर्जुन बबुता आणि रमिता जिंदाल यांची जोडी ६ व्या क्रमांक पर्यंत पोहोचू शकली. दरम्यान काल पॅरिसच्या सीन नदीच्या किनारी रंगलेल्या दिमाखदार सोहळ्यात पॅरिस ऑलिंपिक चं उद्धघाटन झालं.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये भारत आणि श्रीलंके दरम्यानच्या तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना आज होणार आहे. श्रीलंकेतल्या पल्लेकेले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ही मालिका खेळणार आहे. गौतम गंभीर यांची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर ही पहिलीच मालिका आहे. महिला क्रिकेटमध्ये टी ट्वेंटी आशिया चषक स्पर्धेत काल भारताने बांगलादेशचा पराभव करत अंतिम

फेरीत प्रवेश केला. स्पर्धेचा अंतिम सामना भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यात उद्या रंगणार आहे.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या निती आयोगाच्या संपूर्णतः अभियानांतर्गत नांदेड जिल्ह्यातल्या किनवट तालुक्यातली ९० टक्के नागरिकांची उच्च रक्तदाब आणि मधुमेह तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

**<><><><><>**

**मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य प्रदेश, हरयाणा, छत्तीसगड, विदर्भ, कोकण, कर्नाटकाचा दक्षिण** भाग आणि **गोव्यात** आज जोरदार पाऊस होईल, असा अंदाज भारतीय हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

येत्या दोन दिवसांत **सौराष्ट्र, कच्छ आणि गुजरातच्या** काही भागासह **उत्तराखंड, राजस्थान, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, केरळ, माहे, जम्मू काश्मीर, लडाख आणि गिलगिट** इथंही जोरदार पावसाची शक्यता आहे. याकाळात, आसाम आणि त्रिपुरा मध्ये वातावरण उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**